**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ६४/२०२२ मधील नि.क्र.६२ वरील आदेश</u>**

**<u>(मनोहर वाघमोडे विरुध्द मंगल गायकवाड)</u>**

**<u>CNR N0-MHSN02-000235-2022</u>**

१. प्रतिवादी क्र.२ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ४ प्रमाणे दावा मिळकतीची मोजणी नगर भूमापन अधिकारी यांच्यामार्फत होण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे सिटी सर्वे नं.४०४ मधील जी मिळकत ही दाव्याचा विषय आहे ती मिळकत वादी यांनी प्रतिवादी क्र.६ यांच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन घेतलेली आहे. तसेच सदरची मिळकत ही वादी यांच्याकडे भाडयाने आहे.

३. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी त्यांच्याविरुध्द जो ठरावाचा व निरंतर ताकीदीचा दावा दाखल केलेला आहे, त्यामध्ये सि.स.नं.४०४ मधील मिळकतीबाबत उभयतांच्या परस्परविरोधी तक्रारी आहेत. त्यामुळे खरी वस्तुस्थिती समोर येण्याच्या दृष्टीने दावा मिळकतीची नगर भूमापन अधिकारी यांच्यामार्फत मोजणी होवून मिळण्याकरीता प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. सदरहु अर्जाला अनुसरुन वादी यांनी नि.क्र.६३ कडे त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादीच्या दाव्यातील मागणीचा विचार करता प्रतिवादींचा कोर्ट कमिशनर नेमणूकीचा अर्ज हा कायदयाने चालू शकत नाही. तसेच प्रतिवादी यांनी चुकीचे कलम नमूद करुन कोर्ट कमिशनर नेमणूकीची मागणी केलेली आहे. ती मागणी देखील कायदयातील तरतुदींशी विसंगत अशी आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या अर्जातील मागणीचा विचार करता ते कोर्टाची मदत घेवून कोर्ट कमिशनरची नेमणूक ही पुरावा गोळा करण्यासाठी करु शकत नाहीत. सबब त्यांनी प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

५. सदरहु अर्जाला अनुसरुन वादी–प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. मुळ दाव्याचे अवलोकन केले. यापूर्वी नि.क्र.३० प्रमाणे जो वकील कोर्ट कमिशनर यांनी मिळकतीची पाहणी करुन दिलेल्या अहवालाचे अवलोकन केले. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. प्रतिवादी यांनी दाव्याला अनुषंगून जी कैफियत दाखल केलेली आहे. त्यामध्ये वादीविरुध्द प्रतिदावा दाखल केलेला नाही अगर स्वतंत्रपणे प्रतिदावा दाखल केलेला नाही. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी प्रतिवादी क्र.६ यांच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले आहे. प्रतिवादी क्र.६ हे आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका आहेत. प्रतिवादी क्र.६ यांनी वादींनी दाखल केलेल्या दाव्याला अनुषंगून जी नि.क्र.३६ प्रमाणे कैफियत दाखल केलेली आहे त्यामध्ये त्यांनी वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारी सर्वसाधारण बरोबर आहेत असे प्रतिपादन केलेले आहे. जर प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी यानी प्रतिवादी क्र.६ महानगरपालिकेच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले असेल तर ती तक्रार महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादी क्र.६ च्या मिळकतीमध्ये वादी यांनी अतिक्रमण केलेले आहे अशी तक्रार प्रतिवादी क्र.६ यांनी केलेली नाही.

७. महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी क्र.२ हे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ४ प्रमाणे नगर भूमापन अधिकारी यांची मोजणी करण्यासाठी नियुक्ती करुन मागत आहेत. परंतु दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ४ चे अवलोकन केले तर एखादया व्यक्तीचा पुरावा घेण्यासाठी कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करण्यासंदर्भात सदरहु कलमान्वये मागणी केली जाते. त्यामुळे प्रतिवादी यांनी ज्या कलमाचा उल्लेख करुन कोर्ट कमिशनरची नियुक्ती करुन मागितलेली आहे त्या कलमाप्रमाणे देखील मिळकतीची मोजणी होवू शकत नाही.

८. सदरचा प्रतिवादींचा अर्ज काहीतरी कलमांचा उल्लेख चुकीचा केला या एकमेव कारणास्तव फेटाळला जात नसून अशा प्रकारे ज्या मिळकतीमध्ये प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी अतिक्रमण केले त्या मिळकती संदर्भात प्रतिवादी क्र.६ यांची काही तक्रार नसताना त्याबाबत प्रतिवादी क्र.२ तक्रार करत आहेत ही प्रतिवादी क्र.२ यांची मागणी पटण्यायोग्य नाही. सदरहु मागणीच्या माध्यमातून एक प्रकारे प्रतिवादी क्र.२ हे त्यांची बाजू सिध्द करण्याकरीता पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करत आहेत हा वादी यांनी केलेला युक्तीवाद निश्चित दुर्लक्षीत करता येण्यासारखा नाही. त्यामुळे कोर्ट कमिशनर यांची मदत प्रतिवादी क्र.२ हे पुरावा गोळा करण्यासाठी करत आहेत असे सकृतदर्शनी दिसून येत असल्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांचा अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब, आदेश खालील प्रमाणे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.२ यांचा नि.क्र.६२ कडील अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

३. उभय पक्षकारांनी हुकूमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.03.09 11:03:51 +0530

**ठिकाण – सांगली.** **(अभय अ. मेहेंदळे)**

**दिनांक –०८.०३.२०२३** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | ०८/०३/२०२३ |

**पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक-** ०९/०३/२०२३